संचालनालय लेखा व कोषागारे
महाराष्ट्र राज्य, मुंबई-२०.
03 SEP 2026
प्राप्त झाले सही.........................

महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा, सहायक संचालक
संवर्गातील अधिकाऱ्याच्या बदलीबाबत...
श्री. योगेश म. जाधव, सहायक संचालक

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**
शासन आदेश क्रमांक:-ई-१७८४४३६/कोषा. प्रशा-२
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- ०३.०९.२०२६.

## शासन आदेश

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील कलम ४ (४) (दोन) व ४ (५) मधील तरतूदीनुसार बदली करण्यास सक्षम असलेल्या प्राधिकाराच्या मान्यतेने महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील सहायक संचालक, गट-अ संवर्गातील खालील विवरणपत्रात नमूद अधिकाऱ्याची स्तंभ क्र.४ मध्ये दर्शविलेल्या पदावर प्रशासकीय कारणास्तव बदलीने पदस्थापना करण्यात येत आहे:-

| अ.क्र | अधिकाऱ्यांचे नाव | सध्याचे पदनाम व कार्यालय | बदलीनंतरची पदस्थापना |
|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. |
| १ | श्री. योगेश महादेव जाधव | सहायक संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा, सोलापूर | सहायक संचालक लेखा, आयुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय) यांचे कार्यालय, पुणे |

२. श्री. जाधव यांनी बदलीच्या पदावर तात्काळ रुजू व्हावे. पदस्थापनेच्या पदावर रुजू न झाल्यास महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम, १९७९ मधील तरतूदींनुसार कारवाई करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

३. बदलीच्या ठिकाणी हजर होताच शासनास तसेच, संचालक, संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई यांना अवगत करावे.

४. श्री. जाधव यांनी त्यांच्या नवीन पदाचा कार्यभार स्विकारताच त्यांच्या वैयक्तिक माहितीचा तपशील HRMS मधील नमून्यात भरून नवीन कार्यालय प्रमुखांमार्फत वित्त विभाग तसेच, संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई या कार्यालयास सादर करावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(रुपाली सं. कबरे)
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. सहसचिव, मा. मुख्यमंत्री तथा मा. मंत्री (वित्त) यांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई,
२. महालेखापाल १/२ (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परिक्षा) महाराष्ट्र, मुंबई/नागपूर, *
३. संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, मुंबई,
४. संचालक, स्थानिक निधी लेखा परिक्षा, कोकण भवन, नवी मुंबई, *
५. संबंधित अधिकारी यांचे सध्याच्या पदाचे कार्यालय प्रमुख,*
६. संबंधित अधिकारी यांचे नवीन पदस्थापनेच्या पदाचे कार्यालय प्रमुख,*
७. संबंधित अधिकारी *

८. निवडनस्ती/कोषा प्रशा-२,
(*संचालक, लेखा व कोषागारे, संचालनालय, मुंबई यांचे मार्फत)